भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# विक्री प्रवर्धन कामगार (सेवाशर्ती) अधिनियम, १९७६

(१९७६ चा अधिनियम क्रमांक ११)

(१५ जून, १९९६ रोजी यथाविद्यमान)

# THE SALES PROMOTION EMPLOYEES (CONDITIONS OF SERVICE) ACT, 1976

(Act No. 11 of 1976)

*(As in force on the 15th June 1996)*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[किंमत : रुपये ४.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १५ जून १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला दि सेल्स प्रमोशन एम्प्लॉयीज (कन्डिशन ऑफ सर्विस) ॲक्ट, १९७६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक २, दिनांक २२ डिसेंबर, १९९७ यात पृष्ठ ८२ ते ८६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक :२२ डिसेंबर, १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Sales Promotion Employees (Conditions of Service) Act, 1976 as on the 15th June 1996 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary Part XII, Section 1, No.2, Vol. 8 dated 22nd December 1997 on pages 82 to 86.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,
date : 22nd December, 1997.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# विक्री प्रवर्धन कामगार (सेवाशर्ती) अधिनियम, १९७६

## कलमांचा क्रम

कलमे


१ संक्षिप्त नाव व विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

२ व्याख्या.

३ विवक्षित उद्योग, अधिसूचित उद्योग असल्याचे जाहीर करण्याची शासनाची शक्ती.

४ रजा.

५ नेमणूक पत्र देणे.

६ विक्री प्रवर्धन कामगारांकरिता विवक्षित अधिनियमांची प्रयुक्ती.

७ नोंदवह्या जतन करणे.

८ निरीक्षक.

९ शास्ती.

१० कंपन्यांनी केलेले अपराध.

११ अपराध्यांची दखल.

११क. या अधिनियमाशी विसंगत कायदे व करार यांचा प्रभाव.

१२ नियम करण्याची शक्ती.


एच ४३८८—२ (१०४०--७-२००४)

# विक्री प्रवर्धन कामगार (सेवाशर्ती) अधिनियम, १९७६

**(१९७६ चा अधिनियम क्रमांक ११)**

(१५ जून, १९९६ रोजी यथाविद्यमान)

[२५ जानेवारी, १९७६]

विवक्षित आस्थापनांतील विक्री प्रवर्धन कामगारांच्या विवक्षित सेवशर्तींचे नियमन करण्याकरिता अधिनियम.

हा अधिनियम भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

**१.** (१) या अधिनियमास ' विक्री प्रवर्धन कामगार (सेवाशर्ती) अधिनियम, १९७६ ' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [1][तारखेस] हा अधिनियम अंमलात येईल, आणि भिन्न राज्यांसाठी भिन्न दिनांक नियत करता येतील.

(४) औषधनिर्माण उद्योगात गुंतलेल्या प्रत्येक आस्थापनेला हा अधिनियम प्रथमतः लागू होईल.

(५) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून कोणत्याही अधिसूचित उद्योगात गुंतलेल्या कोणत्याही इतर आस्थापनेला या अधिनियमाचे उपबंध लागू करू शकेल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) " आस्थापना " याचा अर्थ, औषधनिर्माण उद्योगात किंवा इतर अधिसूचित उद्योगात गुंतलेली एखादी आस्थापना, असा आहे ;

(ख) " अधिसूचित उद्योग " याचा अर्थ, कलम ३ अन्वये, अधिसूचित म्हणून जाहीर केलेला एखादा उद्योग, असा आहे ;

(ग) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

[2][(घ) " विक्री प्रवर्धन कामगार " याचा अर्थ, विक्रीच्या किंवा धंद्याच्या प्रवर्धनाशी किंवा दोन्हीच्या प्रवर्धनाशी संबंधित कोणतेही काम करण्याकरिता भाड्याने किंवा बक्षिसी देऊन कोणत्याही आस्थापनेत कामावर लावलेली किंवा गुंतलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी (त्यात शिकाऊ उमेदवारांचा अंतर्भाव आहे) कोणतीही व्यक्ती, असा आहे, परंतु त्यात,—

(एक) जी व्यक्ती, पर्यवेक्षकीय नात्याने कामगार असेल किंवा कामात गुंतलेली असेल व दरमहा सोळाशे रुपयांहून अधिक असेल इतकी मजुरी घेत असेल ; किंवा

(दोन) जी व्यक्ती व्यवस्थापकीय किंवा प्रशासकीय नात्याने कामावर असेल किंवा कामात गुंतलेली असेल,

तिचा अंतर्भाव होत नाही.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ एखाद्या व्यक्तीची दर महिन्याची मजुरी ही, ज्या दिनांकापासून त्या मजुरीची गणना करावयाची असेल त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या बारा महिन्यांतील त्याच्या अखंड सेवेच्या कालावधीच्या संबंधातील त्याच्या एकूण मजुरीच्या (यात कमिशन अंतर्भूत असो वा नसो किंवा केवळ कमिशन अंतर्भूत असो) रकमेच्या तीस पटी इतक्या रकमेस त्याच्या सेवेच्या कालावधीतील दिवसांनी भागून काढलेल्या रकमेइतकी असेल.]

(ङ) या अधिनियमात वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले व औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) यामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

---

१. ६ मार्च, १९७६, भारताचे राजपत्र, असाधारण, भाग दोन, विभाग ३ (दोन) पृष्ठ क्र. ५३३ वर प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. १७६ (ई), दिनांक ६ मार्च, १९७६.

२. १९८६ चा अधिनियम ४८ कलम २ द्वारे मूळ खंड (घ) ऐवजी दाखल केले.

विवक्षित उद्योग, अधिसूचित उद्योग असल्याचे जाहीर करण्याची शासनाची शक्ती.

**३.** केंद्र शासन, (औषधनिर्माण उद्योग नसलेल्या) कोणत्याही उद्योगाचे स्वरुप, विक्रीच्या किंवा धंद्याच्या प्रवर्धनाशी किंवा दोन्हीशीही संबंधित कोणतेही काम करण्याकरिता अशा उद्योगात कामावर लावलेल्या कामगारांची संख्या, अशा कामगारांच्या सेवाशर्ती आणि केंद्र शासनाच्या मते जे संबद्ध असतील असे इतर घटक विचारात घेऊन असे उद्योग हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अधिसूचित उद्योग असल्याचे जाहीर करू शकेल.

रजा.

**४.** [१][ (१) ] विहित करण्यात येतील अशा सुट्ट्या, नैमित्तिक रजा किंवा इतर प्रकारच्या रजा या व्यतिरिक्त,

[२][ * * * * * * * ]

प्रत्येकी विक्री प्रवर्धन कामगाराला त्याने तशी विनंती केल्यास,

(क्) कर्तव्यार्थ व्यतित केलेल्या कालावधीच्या एक अकरांशापेक्षा कमी नाही इतकी पूर्ण वैतनिक अर्जित रजा ;

(ख्) बैद्यकीय प्रमाणपत्रावर, सेवेच्या कालावधीच्या एक अठरांशापेक्षा कमी नाही एवढी रजा, मंजूर करण्यात येईल.

[३][ (२) ] विक्री प्रवर्धन कामगार, ज्या कमाल मर्यादेपर्यंत अशी संचित अर्जित रजा साठवू शकेल ती मर्यादा विहित करण्यात येईल इतकी असेल.

(३) "विक्री प्रवर्धन कामगार" एकावेळी ज्या मर्यादेपर्यंत अर्जित रजा घेऊ शकेल आणि ज्या कारणांसाठी अशी मर्यादा वाढविता येईल, ती मर्यादा व कारणे विहित करण्यात येतील तशी असतील.

(४) विक्री प्रवर्धन कामगार,

(क्) जेव्हा सेवेतील त्याचे पद स्वेच्छेने त्यागील किंवा स्वेच्छानिवृत्त होईल ; किंवा

(ख्) जेव्हा त्याची सेवा कोणत्याही कारणास्तव (शिक्षा म्हणून करण्यात येणाऱ्या समाप्ती व्यतिरिक्त) समाप्त करण्यात येईल,

तेव्हा तो, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने (यात, ज्या कमाल कालावधीकरिता अशी रोख भरपाई देय असू शकेल, तो कालावधी विनिर्दिष्ट करण्याच्या शर्तीचा अंतर्भाव असेल) त्याने उपार्जित केलेल्या व न घेतलेल्या अर्जित रजेच्या संबंधात रोख भरपाई मिळण्यास हक्कदार असेल.

(५) सेवेत असताना विक्री प्रवर्धन कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याचा वारस, त्याने उपार्जित केलेल्या आणि न घेतलेल्या अर्जित रजेसाठी रोख भरपाई मिळण्यास हक्कदार असेल.

(६) पोटकलम (४), किंवा प्रकरणपरत्वे, पोटकलम (५) अन्वये, विक्री प्रवर्धन कामगाराला, किंवा प्रकरणपरत्वे, त्याच्या वारसांना त्या अर्जित रजेच्या कालावधीकरिता रोख भरपाई मिळण्याचा हक्क असेल, त्या कालावधीकरिता त्या कामगाराला, किंवा प्रकरणपरत्वे, त्याच्या वारसांना देय असलेली रोख भरपाई अशा विक्री प्रवर्धन कामगाराला त्या कालावधीकरिता देय असलेल्या वेतनाच्या रकमेइतकी असेल.]

नेमणूक पत्र देणे.

**५.** विक्री प्रवर्धन कामगारांशी संबंधित प्रत्येक सेवायोजक अशा प्रत्येक कामगाराला,

(क्) अधिनियमाच्या प्रारंभी तो असे पद धारण करीत असेल त्याबाबतीत, अशा प्रारंभापासून तीन महिन्यांच्या आत ; आणि

(ख्) तर कोणत्याही बाबतीत, त्याची तशी नेमणूक झाल्यावर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नेमणूक पत्र देईल.

विक्री प्रवर्धन कामगारांकरिता विवक्षित अधिनियमांची प्रयुक्ती.

**६.** (१) "कामगार भरपाई अधिनियम, १९२३" (१९२३ चा ८) याचे, त्याकाळी अंमलात असलेले उपबंध त्या अधिनियमांच्या अर्थान्तर्गत, कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात जसे लागू होतात तसे ते विक्री प्रवर्धन कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात लागू होतील.

[४][ * * * * * ]

---

१. १९८६ चा अधिनियम ४८, कलम ३ द्वारे मूळ कलम ४ ला "४[(१)]" असा नवीन क्रमांक दिला, (८ मार्च, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे ही पोटकलमे समाविष्ट करण्यात आली. (८ मार्च, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. १९८२ चा अधिनियम ४६, कलम २४ द्वारे वगळण्यात आले.

(३) " किमान वेतन अधिनियम, १९४८ " (१९४८ चा ११) यांचे त्या काळी अंमलात असलेले उपबंध त्या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात जसे लागू होतात तसे ते विक्री प्रवर्धन कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात लागू होतील.

(४) " प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१ " (१९६१ चा ५३) याचे त्या काळी अंमलात असलेले उपबंध या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत कोणत्याही आस्थापनेत वेतन देऊन एखाद्या स्त्रिला किंवा तिच्या संबंधात असे लागू होतील.-- मग ती प्रत्यक्ष किंवा कोणत्याही एजन्सीमार्फत कामावर लावलेली असो-- तसे ते विक्री प्रवर्धन कामगार स्त्रियांना किंवा यांच्या संबंधात लागू होतील.

(५) " बोनस प्रदान अधिनियम, १९६५" (१९६५ चा २१) याचे त्या काळी अंमलात असलेले उपबंध त्या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात जसे लागू असतील तसे ते विक्री प्रवर्धन कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात लागू असतील.

(६) " उपदान प्रदान अधिनियम, १९७२ " (१९७२ चा ३९) याचे त्या काळी अंमलात असलेले उपबंध त्या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात जसे लागू असतील किंवा तसे ते विक्री प्रवर्धन कामगारांना किंवा त्यांच्या संबंधात लागू असतील.

[१][ (७) पूर्ववर्ती पोटकलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) उक्त पोटकलमांमध्ये निर्देशित करण्यात आलेला कोणताही अधिनियम, विक्री प्रवर्धन कामगारांस लागू करताना, अशा अधिनियमांच्या प्रयोजनार्थ, विक्री प्रवर्धन कामगाराची मजुरी ही, या अधिनियमाच्या उपबंधानुसार गणना केल्याप्रमाणे त्याची मजुरी असल्याचे मानण्यात येईल.

(ख) जेथे उक्त पोटकलमामध्ये निर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमाद्वारे मजुरीची कमाल मर्यादा, त्या मर्यादेहून अधिक मजुरी असणाऱ्या व्यक्तींना त्या अधिनियमाच्या कक्षेतून वगळण्याच्या दृष्टीने उपबंधित करण्यात आलेली असेल तेथे, ज्या विक्री प्रवर्धन कामगारांची या अधिनियमाच्या उपबंधानुसार गणना केलेली मजुरी अशा कमाल मर्यादेपेक्षा अधिक असेल त्यांना तो अधिनियम लागू होणार नाही. ]

**७.** एखाद्या आस्थापनेशी संबंधित प्रत्येक सेवायोजक विहित करण्यात येतील अशा नोंदवह्या व इतर दस्तऐवज विहित रीतीने ठेवील व जतन करील. नोंदवह्या जतन करणे.

**८.** (१) राज्य शासन या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निरीक्षक होण्यास त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींची निरीक्षक म्हणून नियुक्ती करू शकेल आणि त्यांनी त्यांची कामे ज्या स्थानिक सीमांमध्ये पार पाडावयाची त्या सीमा निश्चित करू शकेल. निरीक्षक.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला कोणताही निरीक्षक, एखाद्या आस्थापनेच्या बाबतीत या अधिनियमाच्या उपबंधाचे अनुपालन करण्यात आले आहे किंवा कसे हे सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ,

(क) त्यात आवश्यक वाटेल तशी माहिती पुरविण्यास एखाद्या सेवायोजकांस भाग पाडू शकेल ;

(ख) आस्थापनेत किंवा तिच्याशी संलग्न अशा कोणत्याही वास्तूत कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करू शकेल आणि तिची जी कोणी प्रभारी असल्याचे आढळून येईल अशा व्यक्तीस, विक्री प्रवर्धन कामगारांच्या सेवायोजनांशी संबंधित कोणत्याही नोंदवह्या व इतर दस्तऐवज तपासणीसाठी त्याच्यासमोर हजर करण्यास फर्मावू शकेल.

(ग) पूर्वोक्त प्रयोजनाशी संबंधित कोणत्याही बाबीच्या संबंधात नियोक्त्याची, त्याच्या अभिकर्त्याची किंवा कर्मचाऱ्याची किंवा संबंधित कोणत्याही आस्थापनेची किंवा तिला संलग्न असलेल्या कोणत्याही आवाराची प्रभारी असल्याचे आढळून येईल अशा कोणाही इतर व्यक्तींची किंवा आस्थापनेत जी विक्री प्रवर्धन कर्मचारी आहे किंवा असेल असे निरीक्षकास सकारण वाटत असेल, अशा कोणत्याही व्यक्तीची तपासणी करू शकेल.

(घ) या अधिनियमाखालील आस्थापनेच्या संबंधात जतन केलेल्या कोणत्याही नोंदवहीच्या किंवा इतर दस्तऐवजाच्या प्रती काढू शकेल किंवा त्यातून उतारे घेऊं शकेल.

(ङ) विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करू शकेल.

---

१. १९८६ चा अधिनियम ४८, कलम ४ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

(३) प्रत्येक निरीक्षक हा, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) याचे कलम २१ च्या अर्थान्तर्गत शासनाचा सेवक असल्याचे मानण्यात येईल.

(४) कोणत्याही निरीक्षकाने, पोटकलम (२) अन्वये कोणतीही नोंदवही किंवा इतर दस्तऐवज हजर करण्यास किंवा माहिती देण्यास जिला फर्माविले असेल ती कोणतीही व्यक्ती तसे करण्यास बद्ध असेल.

शास्ती. **९.** कोणत्याही सेवायोजकाने, कलम ४ किंवा कलम ५ किंवा ७ यांच्या उपबंधाचे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण केल्यास एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस तो पात्र असेल.

कंपन्यांनी केलेल अपराध. **१०.** (१) कंपनीकडून या अधिनियमाखालील अपराध करण्यात आला असेल त्या बाबतीत, अपराध घडला असेल त्यावेळी, कंपनीच्या कामकाज चालनाचा प्रभार जिच्याकडे असेल व त्याबद्दल जी कंपनीला जबाबदार असेल, अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी ही, अपराधाबद्दल कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असेल :

परंतु, असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे वाजवी तत्परता दाखवली होती, असे अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुंळे ती व्यक्ती तसेच ती कंपनी, या कलमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या कंपनीने या अधिनियमाखालील एखादा अपराध केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मुकानुमतीने तो अपराध घडलेला आहे किंवा अपराध घडण्याचा कारण संबंध त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी जोडता येण्यासारखा आहे, असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी देखील अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र राहील.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क्) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे आणि त्यात एखादी पेढी किंवा अन्य व्यक्ती संघाचा समावेश होतो ; आणि

(ख्) "संचालक" याचा एखाद्या पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील एखादा भागीदार असा आहे.

अपराधांची दखल. **११.** (१) एखाद्या महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा एखाद्या प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाकडून कनिष्ठ असे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

(२) कोणतेही न्यायालय, अपराध ज्या दिनांकी केला गेल्याचे अभिकथित केलेले आहे त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्याबद्दल तक्रार केली नसेल तर, या अधिनियमाखालील अपराधाची दखल घेणार नाही.

या अधिनियमाशी विसंगत कायदे व करार यांचा प्रभाव. [१][**११क.** (१) या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे उपबंध, इतर कोणत्याही कायद्यात या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर केला गेलेला किंवा कोणताही निवाडा, करार, समझोता किंवा सेवासंविदा यांच्या परिभाषेत, त्यांच्याशी विसंगत असे काहीही असले तरी, प्रभावी राहतील :

परंतु, विक्री प्रवर्धन कामगार हा असा कोणताही कायदा, निवाडा, करार, समझोता किंवा सेवासंविदा याखाली किंवा अन्यथा कोणत्याही बाबींच्या संबंधात, ज्या लाभांचा तो या अधिनियमाखाली हक्कदार झाला असता त्याहून अधिक अनुकूल लाभांचा हक्कदार असेल तेव्हा, विक्री प्रवर्धन कामगार हा, अधिनियमाखाली इतर बाबींच्या संबंधात लाभ मिळण्यास हक्कदार असला तरीही, त्या बाबींसंबंधात अधिक अनुकूल लाभ मिळण्यास हक्कदार असल्याचे चालू राहील.

(२) विक्री प्रवर्धन कामगार या अधिनियमाखाली कोणत्याही बाबतीत जे कोणतेही अधिकार किंवा विशेषाधिकार यांचा हक्कदार झाला असता त्याहून अधिक अनुकूल असतील असे अधिकार किंवा विशेषाधिकार त्याला मिळण्यासाठी त्याच्या नियोक्त्याकडे त्याने करार करण्यास प्रतिबंध होतो, असा या अधिनियमातील कोणत्याही गोष्टींचा अर्थ लावण्यात येणार नाही.]

---

१. १९८२ चा अधिनियम ६९, कलम २ द्वारे समाविष्ट केले (१३ नोव्हेंबर, १९८२ रोजी व तेव्हापासून).

नियम करण्याची शक्ती.

**१२.** (१) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमात,—

(क) एखाद्या विक्री प्रवर्धन कामगारास कलम ४ खाली मंजूर करण्यात येतील त्या रजांचे प्रकार [१][तो ज्या मर्यादेपर्यंत संचित अर्जित रजा साठवू शकेल ती मर्यादा, एकावेळी तो जेवढी रजा घेऊ शकेल त्याची मर्यादा आणि अशी मर्यादा ज्या कारणांसाठी वाढवता येईल ती कारणे ज्या शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीन राहून, त्याला रोख भरपाई मिळण्याचा हक्क असेल त्या शर्ती व निर्बंध] ;

(ख) कलम ५ खाली द्यावयाच्या नेमणूक-पत्राचा नमुना ;

(ग) कलम ७ खाली ठेवावयाच्या व जतन करावयाच्या नोंदवह्या व इतर दस्तऐवज ज्या रीतीने ठेवावयाचे ती रीत ;

(घ) विहित करावी लागेल अथवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब,

यासाठी उपबंध करण्यात येतील.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते, सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शुन्यीकरणामुळे, तत्पूर्वी ह्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

---

१. १९८६ चा अधिनियम ४८, कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (८ मार्च, १९७६ रोजी व तेव्हापासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई